<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. बी.एन.प्रभू यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>

०४ हे म्हणणे खरे आहे की माझ्या म्हणण्याप्रमाणे जप्त हत्यार तपासणी करीता नेण्याबाबत डयुटी बटवडा रजिस्टर या व्यतिरिक्त कोणताही दुसरा कार्यालयीन आदेश उपलब्ध नाही. (साक्षीदाराला निशाणी ३० कडील पत्र दाखविण्यात आले.)

प्रश्न – निशाणी ३० कडील पत्रावरील दिनांकामध्ये खाडाखोड आहे का ?

उत्तर – सदर पत्रामधील दिनांकामध्ये खाडाखोड आहे की दुरुस्ती हे मी सांगू शकत नाही.

०५. (साक्षीदाराला दि.२९/०९/२०१८ रोजीचे पत्र दाखविण्यात आले.) **<u>(सदर पत्रास निशाणी ३२ देण्यात येते.)</u>** हे म्हणणे खरे आहे की निशाणी ३० व ३२ कडील पत्रांमधील मजकूर हा समान आहे. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ३२ कडील पत्रामध्ये पोलीस कर्मचारी ढाले यांचे नाव नमूद आहे. पोलीस अधिकारी जी.के.भिसे यांना जप्त मुद्देमाल दि. २९/०९/२०१८ रोजी वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे तपासणीकरीता पाठवायचा होता किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल निशाणी ३२ कडील पत्रान्वये ढाले यांच्या ताब्यात देण्यात आला होता किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. मुद्देमाल माझ्या ताब्यात देण्यापुर्वी ढाले यांच्या ताब्यात देण्यात आला होता व त्यांनी तो प्रयोगशाळेमध्ये नेवून जमा केला नाही किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. जप्त मुद्देमाल ढाले यांच्या ताब्यामध्ये अनधिकृतरित्या राहिला होता किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ३० कडील पत्रासोबत जप्त मुद्देमाल हा दि. ११/१०/२०१८ रोजी माझ्या ताब्यामध्ये देण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की दि. १२/१२/२०१८ रोजी मुद्देमाल प्रयोगशाळेत जमा करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ३० कडील पत्रावरील दिनांकावरुन जप्त मुद्देमाल हा दोन महिने संबंधीत पोलीस अधिकारी यांच्या ताब्यात होता असे दिसून येते. केवळ प्रस्तुत गुन्हयातील जप्त मुद्देमाल न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे जमा करण्याकरीता माझ्याकडे देण्यात आला होता. माझ्याकडे जप्त मुद्देमाल मुद्देमाल कारकून यांनी ताब्यामध्ये दिला होता. प्रस्तुत गुन्ह्याकामी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे जमा करण्याकरीता माझ्याकडे केवळ एकच सिलबंद

वस्तू देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की मुद्देमाल कारकून संबंधीत मुद्देमालाची नोंद रजिस्टरमध्ये घेवून तद्नंतर सदरील मुद्देमाल हा मुद्देमाल प्रयोगशाळेत नेणाऱ्या व्यक्तीच्या ताब्यात देतो. हे म्हणणे खरे आहे की मुद्देमाल कारकून हा मुद्देमाल ताब्यात देतेवेळी रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात आलेला नंबर हा सदरील मुद्देमालावरील सिलच्या बाहेरील बाजूस नोंदवितो. हे म्हणणे खरे आहे की मुद्देमालावरील सिलच्या बाहेरील नोंदविण्यात आलेला नंबर हा सदरील मुद्देमालाची ओळख असते. हे म्हणणे खरे नाही की मुद्देमाल प्रयोगशाळेत नेणाऱ्या व्यक्तीस देण्यात येणाऱ्या पोहोचवरती सदरील मुद्देमालावरील सिलच्या बाहेर नोंदविण्यात आलेला नंबर टाकणे बंधनकारक असते. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ३० कडील पत्रामध्ये अथवा सदर पत्रावर देण्यात आलेल्या पोहोचवरती मुद्देमालावरील सिलच्या बाहेर नोंदविण्यात आलेला नंबर नमूद नाही.

**(आरोपीतर्फे वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब. )**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– ०६/०८/२०२५

(एस.जे.चिवटे)

न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.